जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 APR 2017
महाराष्ट्र टाईम्स

# रुसा केंद्राच्या डिजिटल प्रकल्पाचे आज उद्घाटन

**कोल्हापूर :** राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानातंर्गत (रुसा) नॅचरल प्रोडक्टस केंद्राचे डिजिटल प्रकल्पाचे सोमवारी (ता. १७) सकाळी दहा वाजता केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. देशातील सर्व रुसा केंद्राचे लॉचिंग नवी दिल्ली येथून एकाचवेळी उद्घाटन होणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले असून यावेळी खासदार धनंजय महाडिक व संभाजीराजे छत्रपती, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. तरी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 APR 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात डॉ. आंबेडकर, म. फुले जयंती उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये महात्मा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्रतिमा पूजन व ग्रंथांना वंदन करून करण्यात आले. यावेळी डॉ. जयदीप एस. बागी, प्रमुख वक्ते डॉ. पी. एस. कांबळे, प्रो. व्ही. के., कांबळे, प्रा. एस. एम. गायकवाड, प्रा. रमेश रणपिसे आदी उपस्थित होते.

विद्यार्थी प्रतिनिधी अनिल बोकेफोडे यांनी गाण्याच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. यावेळी डॉ. बाबासाहेब व महात्मा फुले यांचे पोस्टरचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. डॉ. एस. के. साहू यांनी आभार मानले. सूत्रसंचालन नेताजी चंद्रशेखर यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
17 APR 2017 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या व्यावसायिक महाविद्यालयांना मान्यता

## शिवाजी विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून (२०१७-१८) नवीन व्यावसायिक महाविद्यालयांचे प्राप्त प्रस्ताव मान्य करून शासनास पाठवण्यात येणार असल्याबाबतची मंजुरी शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत शनिवारी देण्यात आली. परिषदेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते, तर सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. नव्या महाविद्यालयांच्या प्रस्ताव मंजुरीसह नवीन विषय, प्रवेश क्षमतावाढ, अतिरिक्त तुकडी, नवीन अभ्यासक्रम (व्यावसायिक) आदींच्या प्रस्तावांना मान्यता दिली. आयजीटीआर ॲडव्हान्सड टेक्नॉलॉजी ट्रेनिंग सेंटर स्थापन करण्याच्या अनुषंगाने विद्या परिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली आहे.